# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि नगर, अकोला - ४४४१०४
## अर्थ प्रशासन विभाग

दुरध्वनी क्र.०७२४-२२५८४६९ फॅक्स क्र.०७२४-२२५८८७३
नियंत्रक- श्री. जे.एस. मानमोठे E-mail: comptroller@pdkv.ac.in


जा.क्र. वि.प्र.वि./अंदाज/भा.कृ.अ.प./७वे वेतन/२०२१-२०२२/ 733 दिनांकः 18/8/2021

**संदर्भः-** १) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रं. AUG-3719/CR-41/6-A Dated 12th August, 2021
२) कुलसचिव यांचे आदेश क्रं. बिईए/७वे वेतन/शिक्षकवर्गीय/वे.त.प./११५९/२०२१ दि. १३/०८/२०२१

## परिपत्रक

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भानुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची सुधारीत वेतन संरचना लागू करण्यात आली आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी संदर्भिय शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तींचे तंतोतंत पालन करण्याच्या दृष्टीने शासन निर्णयाचे काळजीपुर्वक वाचन करुन शासन निर्णय व्यवस्थितरित्या समजुन घ्यावा.

२) शासन निर्णयाप्रमाणे आपल्या अधिनस्त सर्व पात्र शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची त्यांचे स्तरावर वेतन निश्चिती करुन त्यांच्याकडून शासन निर्णयात निर्देश दिल्याप्रमाणे हमीपत्र घेवून त्यांच्या वेतनाची थकबाकी आणि नियमित वेतन आहरीत करण्याची दक्षता घ्यावी.

३) वेतन निश्चितीची पडताळणी कुलसचिव कार्यालयाने गठीत केलेल्या तपासणी पथकाकडून करण्यात यावी.

४) संदर्भिय शासन निर्णयातील मुद्या क्रमांक १९ बाबतचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

५) संदर्भिय शासन निर्णयातील मुद्या क्रमांक २० अन्वये न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असलेल्या शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबतीत दिलेल्या निर्देशांचे अत्यंत जबाबदारीने पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

उपरोक्त सर्व सुचनांचे आणि संदर्भिय शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करुन अंमलबजावणी करण्यात यावी. या बाबत दिरंगाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील याची नोंद घ्यावी.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने.

**स्वाक्षरीत/-**
नियंत्रक,
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत,

१) नियंत्रण अधिकारी..............................................

२) विभाग प्रमुख..................................................(सर्व)

३) आहरण व संवितरण अधिकारी...............................(सर्व)

४) वेतन व लेखाधिकारी, अकोला/नागपुर यांना माहीती व पुढील कार्यवाहीकरीता.

५) प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन माहिति प्रणाली कक्ष, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

प्रतिलीपी:

१) मा. कुलगुरु यांचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.

२) कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला

नियंत्रक,
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला